# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
**E-mail** – nhmgadchiroli2021@gmail.com


आरोग्य सेवा

जा.क्र.NHM/आस्था/१०८४/२०२६.
कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक २० / ०४ /२०२६.

## उमेदवारांकरीता सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच १५ व्या वित्त आयोगांतर्गत विविध कार्यक्रमामध्ये २४ संवर्गातील रिक्त असलेली १७२ पदे भरण्यासाठी भरतीप्रक्रिया सुरु असून प्रसिद्ध जाहिरातीनूसार अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी दिनांक ०३/०२/२०२६ ते १३/०२/२०२६ या कालावधीत करण्यात आलेली आहे. सदर मुळ कागदपत्र पडताळणी अंती संवर्गनिहाय अंतरिम पात्र / अपात्र उमेदवारांची यादी दिनांक १३/०३/२०२६ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन उमेदवारांना काही आक्षेप / हरकती असल्यास दिनांक १६/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ या कालावधीत आक्षेप अर्ज योग्य त्या पुराव्यासह सादर करण्याबाबत कळविलेले होते. त्यानूसार सदर कालावधीत या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेवून अंतिम पात्र / अपात्र उमेदवारांची यादी व निकाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

परंतू राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचे स्तरावरुन राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर पदांची पुनर्रचना करण्याची कार्यवाही सुरु असल्याने जाहिरातीमध्ये नमुद रिक्त पदे भरण्याबाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे सदर पदे भरण्यात यावी किंवा कसे? याबाबत मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयाकडून मागदर्शन मागविण्यात आलेले आहे. सदर मार्गदर्शन प्राप्त होताच पदभरतीच्या पुढील सुचना जिल्हा परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ www.zpgadchiroli.maharashtra.gov.in यावर प्रसिद्ध करण्यात येईल.

त्याकरिता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावर जावून माहिती घ्यावी. याबाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविल्या जाणार नाही, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष (निवड समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली